# मेट्रो-३ची चाचणी ऑगस्टमध्ये

**प्रतिनिधी/मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पातील पहिली मेट्रो गाडी आंध्रप्रदेशातून ऑगस्टमध्ये मुंबईत दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही गाडी मुंबईत येण्यास विलंब झाल्याने मेट्रो-३ची चाचणी रखडली असून, आता ऑगस्टमध्ये गाडी येणार असल्याने चाचणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मेट्रो-३ प्रकल्पासाठी आंध्रप्रदेशातील श्रीसिटी येथे ३१ मेट्रो गाड्यांची बांधणी करण्यात येत आहे. यातील पहिली गाडी तयार होऊन कित्येक महिने झाले; परंतु गाडी अद्याप मुंबईत दाखल झालेली नाही. कारशेड अधांतरी असल्याने मरोळ-मरोशी येथे तात्पुरते कारशेड बांधण्यात येत आहे. या कारशेडचे काम अपूर्ण असल्याने गाडी आणणे शक्य झाले नाही. आता हे काम पूर्णत्वास आले असून, या कामाची पाहणी भिडे यांनी केली आहे. या अनुषंगाने ऑगस्टमध्ये पहिली मेट्रो मुंबईत दाखल होणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाकडून देण्यात आली आहे.